# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.

**विषय :- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सन २०२३ - २४ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवालास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (अ) नुसार मंजुरी बाबत.**

**प्रस्तावना :-**

उपरोक्त विषयान्वये **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७** (अ) च्या अनुषंगाने पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करुन मा.महासभेपुढे सादर करणे अनिवार्य बंधनकारक असते. पर्यावरण सद्यस्थिती अहवाल स्थायी व भविष्यकालिन विकासासाठी निर्णय घेण्याचे लक्षणीय साधन आहे. म्हणून पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शहरातील पर्यावरणीय व्यवस्थापन व शहरी सुधारणेकरीता अत्यंत महत्त्वाचे ठरते.

पर्यावरण सद्यस्थिती अहवालमध्ये शहरातील वेळोवेळी होणारे बदल व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम तसेच शहर विकास करणेसाठी बदल घडवून आणणाऱ्या परिस्थितीचे अवलोकन केले जातो. म्हणून शहराच्या भविष्यकालिन विकासाकरीता पर्यावरण सद्यस्थिती अहवाल अतिशय उपयुक्त ठरतो.

भिवंडी शहराचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल सन २०२३ - २४ तयार करणोकामी मे. ऑल इंडिया इंन्सटिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्रमेंट, पुणे या तज्ञ अनुभवी तत्रस्त यंत्रणेमार्फत तयार केला असुन, सदर अहवालात हवा, जल, सांडपाणी आणि ध्वनी यांचे नमूने तपासणी तसेच शहरातील जैव विविधता तसेच मार्गदर्शक तत्वे, शिफारशी आणि सुचना शहराचा अपेक्षित विकास साधण्यासाठी उपयुक्त आणि दिशादर्शक ठरतील. त्यामुळे भिवंडी शहराचा शाश्वत विकास करणेकरीता सदर अहवाल खुप महत्वाचा ठरेल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (अ) च्या अनुषंगाने पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करुन माहे ३१ जुलै पुर्वी मा.महासभेपुढे सादर करणे अनिवार्य बंधनकारक असते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार मा.आयुक्त यांना प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा. महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षेनुसार उपरोक्त प्रस्तावास मा.प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या मान्यतेकरीता सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** ४६८ **दिनांक :-** 02/08/2024

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (अ) च्या अनुषंगाने पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करुन मा.महासभेपुढे सादर करणे अनिवार्य बंधनकारक असते. पर्यावरण सद्यस्थिती अहवाल स्थायी व भविष्यकालिन विकासासाठी निर्णय घेण्याचे लक्षणीय साधन आहे. म्हणून पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शहरातील पर्यावरणीय व्यवस्थापन व शहरी सुधारणेकरीता अत्यंत महत्त्वाचे ठरते.

पर्यावरण सद्यस्थिती अहवालमध्ये शहरातील वेळोवेळी होणारे बदल व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम तसेच शहर विकास करणेसाठी बदल घडवून आणणाऱ्या परिस्थितीचे अवलोकन केले जातो. म्हणून शहराच्या भविष्यकालिन विकासाकरीता पर्यावरण सद्यस्थिती अहवाल अतिशय उपयुक्त ठरतो. त्यानुसार भिवंडी महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (अ) च्या अनुषंगाने प्रस्तावनेसह पर्यावरण सद्यस्थिती अहवाल सन २०२३-२४ सादर केला असुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सन २०२३ - २४ चा तयार केलेल्या पर्यावरण सद्यस्थिती अहवालास मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

(श्री.अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**